## निशाणी क्र. ५० वर आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केला आहे. गैरअर्जदार यांनी नि. ५२ लगत म्हणणे देउन अर्जास सक्त विरोध केला आहे.

२) अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जात नमुद असलेली मौजे सायगांव ता. अंबाजोगाई जि.बीड येथे जमीन गट नं. ५५७ ही जमीन पाझर तलावासाठी निवाडा एलएनक्य/एसआर/२१/९३ अन्वये संपादीत करण्यात आलेली आहे. गैरअर्जदार यांनी सदर जमिनीचा मोबदला रक्कम रुपये ४२०/– प्रती आर प्रमाणे ठरविलेला आहे. सदर अर्जात जमिनीचा मोबदला रक्कम रुपये १५००/– प्रती आर प्रमाणे मिळावा अशी मागणी अर्जदारांनी केलेली आहे. प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदार सदरची मागणी रुपये ३५००/– अशी वाढवु इच्छितात त्या अनुषंगाने अर्जाच्या परिच्छेद क्रमांक ४,६,९,१० या मध्ये अंकामध्ये दुरुस्तीची मागणी अर्जदारांनी केली आहे. त्याच प्रमाणे विनंती कलमात देखील वाढीव मागणी अर्जदार करु इच्छितात. अर्जदारातर्फे युक्तिवाद करण्यात आला की, वरील दुरुस्ती मुळे अर्जाचे मुळ स्वरुप बदलत नाही. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यास विनंती करण्यात आली.

३) याउलट सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तावित दुरुस्ती ही मुदतीत नसल्यामुळे ती नामंजुर करण्यात यावी असा आक्षेप घेतला आहे.

४) मी प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले. अर्जदारांनी रुपये १५००/– प्रति आर वाढीव मावेजाची मागणी केलेली आहे. ती वाढवुन अर्जदार रुपये ३५००/– प्रती आर मावेजाची मागणी करीत आहेत. **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी आंब्या काल्या म्हात्रे वि महा. शासन २०११ (४) एससीसी ६१३** या मध्ये अर्जदारांना भु–संपादन अर्ज

प्रलंबित असतांना मागणी केलेल्या मावेजापेक्षा वाढीव मावेजा अर्जात दुरुस्ती करुन मागता येईल असे न्यायतत्व पारित केलेले आहे. प्रस्तावित दुरुस्तीने अर्जदार केवळ वाढीव मावेजाची मागणी करीत आहेत. त्यामुळे मुळ अर्जाच्या स्वरुपात कोणताच बदल होत नाही. तसेच गैरअर्जदार यांना त्यांचे अधिकचे म्हणणे देता येईल. त्यामुळे त्यांच्यावर देखील अन्याय होणार नाही. माझ्या मते प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. मात्र अर्जदारांनी उशीराने दुरुस्ती अर्ज दाखल केल्यामुळे त्यांच्यावर खर्च बसविणे गरजेचे आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (निशाणी ५०) खर्च रककम रुपये २,०००/– गैरअर्जदारांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रत्यक्ष गैरअर्जदारांना दिल्यास अगर न्यायालयात भरल्यास अर्जदारांनी १४ दिवसाच्या आत मुळ अर्जामध्ये वरील प्रमाणे दुरुस्ती करुन तशी दुरुस्त प्रत गैरअर्जदारांच्या प्रतीसह न्यायालयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARESH WAGDOLE
Date: 2024.09.26 17:59:40 +0530

दि. २६/०९/२०२४.

**(परेश रा. वागडोळे)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अंबाजोगाई.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 26/09/2024
Transcribed on: 26/09/2024
Signed on : 26/09/2024

Date:26/09/2024
Place: Ambajogai.

Sd/-
(P.S.Kulkarni)
Marathi Stenographer

Civil Court, S.D.,Ambajogai.